ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या स्थानिक सल्लागार समितीचे पुनर्गठन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-१०१७/प्र.क्र.२५५/फ-१

हैद्राबाद हाऊस, शिबीर कार्यालय, नागपूर

दिनांक:- १५ डिसेंबर, २०१७.

वाचा -

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३०९/फ-१, दि. ०९.११.२०१२.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग डब्ल्यूएलपी -२०१२/प्र.क्र.३०९/फ-१, दि. २१.०१.२०१३.
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग डब्ल्यूएलपी -२०१२/प्र.क्र.३०९/फ-१, दि. १८.०७.२०१४.
४. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक डब्ल्यूएलपी-०११४/प्र.क्र.२६/ फ-१, दि. १६.०८.२०१४.
५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग डब्ल्यूएलपी -२०१२/प्र.क्र.३०९/फ-१, दि. २८.०८.२०१५.
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष २३(६)/वजी/प्र.क्र.४४/२०१७-१८/२२८१ दिनांक २६.१०.२०१७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाने दिनांक २० फेब्रुवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्याचे निसर्ग पर्यटनाबाबत धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार राज्यात निसर्ग पर्यटन राबविण्यात येत होते. तथापि, व्याघ्र प्रकल्पामध्ये पर्यटनासंबधी दाखल जनहित याचिका क्र.२१३३९/२०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने व वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ च्या कलम ३८ O(१),(C) मधील व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटनासंबधी नियम करण्याचे केंद्र शासनाचे प्रदत्त अधिकारास अनुसरुन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाद्वारे दिनांक १५/१०/२०१२ च्या अधिसूचनान्वये व्याघ्र प्रकल्प व त्याचे सभोवताल पर्यटनासाठी मार्गदर्शन सूचना जाहीर केल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर यापूर्वी राज्य शासनाने जाहीर केलेले निसर्ग पर्यटन धोरण हे व्याघ्र प्रकल्पाच्या धोरणाशी सुसंगत असून त्यात विशिष्ट बाबींचा अंतर्भाव करुन संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक तत्वे लागू करण्यात आली आहेत. त्यानुसार व्याघ्र प्रकल्पाच्या भोवतालच्या क्षेत्रातील पर्यटन (सोयीसुविधा) उद्योगाकडून फी आकारुन व तत्सबंधी निर्णय घेऊन त्यापासून मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नातून स्थानिक जनतेचे उपजिवीकेचा विकास करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर क्षेत्राकरिता स्थानिक सल्लागार समितीची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे सल्लागार समितीचे संदर्भ क्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये गठन करण्यात आले होते. सदर समितीतील अशासकीय सदस्यांचा कार्यकाल २ वर्षाचा असून सदर कार्यकाल समाप्त झाला आहे. त्यानुसार प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर येथील स्थानिक सल्लागार समितीचे पुनर्गठन करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्याअनुषंगाने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर येथील स्थानिक सल्लागार समितीचे पुनर्गठन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूरच्या स्थानिक सल्लागार समितीचे खालीलप्रमाणे पुनर्गठन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर

अ. क्र.	सदस्य		
१	विभागीय आयुक्त, नागपूर	पदसिध्द	अध्यक्ष
२	मा.आ.श्री. सुरेश उर्फ बाळु धानोरकर	व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील आमदार	सदस्य
३	मा.आ.श्री. किर्ती कुमार भांगडीया	व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील आमदार	सदस्य
४	मा.आ.श्री. नाना श्यामकुळे	व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील आमदार	सदस्य
५	मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प	पदसिध्द	सदस्य सचिव
६	जिल्हाधिकारी, चंद्रपूर	पदसिध्द	सदस्य
७	उप संचालक (बफर), ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प	पदसिध्द	सदस्य
८	उप संचालक (कोर), ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प	पदसिध्द	सदस्य
९	श्री. बंडू सितारामजी धोत्रे	मानद वन्यजीव रक्षक	सदस्य
१०	प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नागपूर	पदसिध्द	सदस्य
११	अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर	पदसिध्द	सदस्य
१२	उप विभागीय अधिकारी, वरोरा	पदसिध्द	सदस्य
१३	सरपंच, मोहर्ली	पदसिध्द	सदस्य
१४	सरपंच, कोलारा	पदसिध्द	सदस्य
१५	श्रीमती. पुनम धनवटे	वन्यजीव संशोधक	सदस्य
१६	श्री. एम.आर. जांभुळकर, जनता महाविद्यालय, चंद्रपूर	सामाजिक संशोधक	सदस्य
१७	श्री. धनंजय बापट	पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधी	सदस्य

१८	श्री. मनोहर सप्रे	स्थानिक पर्यावरण तज्ञ	सदस्य
१९	श्री. योगेश दुधपचारे, प्राध्यापक, ग्रीन प्लॅनेट सोसायटी	स्थानिक पर्यावरण तज्ञ	सदस्य
२०	श्री. मुकेश रमेशराव भंदककर, वन्यजीव संरक्षण सोसायटी	स्थानिक नागरी संस्थावरील सदस्य	सदस्य
२१	श्री. प्रकाश डोमाजी कामडे, अध्यक्ष, साई स्थानिय नागरी संस्था	स्थानिक नागरी संस्थावरील सदस्य	सदस्य

२. पदसिध्द अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर सदस्यांचा कार्यकाळ दोन वर्षाकरिता राहील.

३. अशासकीय सदस्यांचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम खंड-२ मधील परिशिष्ट ४२ (अे) विभाग १) मधील सुधारीत तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ०३.०३.२०१०. व टीआरए-१४७०/१३१/अठरा दिनांक २७.१.१९७१ अन्वये नियमित करण्यात येतील. त्यानुसार अशासकीय सदस्यांना विमानाने तसेच रेल्वेच्या वातानुकूलित वर्ग-१ श्रेणीने प्रवास करता येणार नाही. तसेच त्यांना खाजगी वाहनांचा वापर करता येणार नाही.

४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३०९/फ-१, दि. २८.०८.२०१५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्थानिक सल्लागार समितीची कार्ये व तरतूदी पूर्वीप्रमाणेच राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२१६१२२७४५३०१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.12.16 12:14:09 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय),
महसूल व वन विभाग

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे अपर मुख्य सचिव.
२. मा. मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३. मा. श्री. सुरेश उर्फ बाळु धानोरकर, विधानसभा सदस्य.

४. मा. श्री.किर्ती कुमार भांगडिया, विधानसभा सदस्य.
५. मा. श्री.नाना श्यामकुळे, विधानसभा सदस्य.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (ग्राम विकास) मंत्रालय मुंबई.
१०. सचिव आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई/नागपूर.
१५. विभागीय आयुक्त, नागपूर
१६. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
१७. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
१८. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर.
१९. उप वनसंरक्षक, मध्यचांदा / ब्रम्हपुरी
२०. विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर.
२१. उपसंचालक कोर / बफर झोन, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
२२. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नागपूर.
२३. उपविभागीय अधिकारी , वरोरा
२४. सरपंच, मोहर्ली/ कोलारा
२५. श्री. बंडू सितारामजी धोत्रे, मानद वन्यजीव रक्षक, चंद्रपूर.
२६. सर्व संबंधित सदस्य.
२७. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
२८. वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
२९. वनकक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३०. फ-१ कार्यासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (निवडनस्ती).

*****